महाराष्ट्र शासन

क्र. एनजीसी २०००/मावि/(२२८/२०००)/मशि ३,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १४ मार्च, २००१

प्रति,
कुलसचिव,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगांव.

विषय : <u>नवीन महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देणेबाबत.....</u>

संदर्भ : उप कुलसचिव (संलग्नता), उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचे पत्र क्र. उमंवि/५/शी-२३/४७८७/९९, दिनांक २९.११.१९९९

महोदय,

सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालये सुरु करण्यासंदर्भात आपल्या विद्यापीठाकडून शासनास प्राप्त झालेल्या शिफारशींच्या अनुषंगाने स्थानिक तथा आसपासच्या परिसरातील उच्च शिक्षणाची वाढती मागणी या बाबी विचारात घेऊन महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम ८२ (५)च्या परंतुकानुसार खाली नमूद केलेल्या संस्थेला त्या समोर दर्शविलेल्या ठिकाणी व दर्शविलेल्या विद्याशाखेचे नवीन महाविद्यालय सुरु करण्यास सन २००१-२००२ या शैक्षणिक वर्षापासून पुढील अटींच्या अधिन राहून शासनाची परवानगी देण्यात येत आहे :-

| संस्थेचे नाव | ठिकाण | विद्याशाखा |
|---|---|---|
| ग्रामविकास शिक्षण मंडळ, मारवड संचलित कै. न्हानाभाऊ मन्साराम तुकाराम पाटील कला महाविद्यालय, अंमळनेर, जि. जळगांव | मारवड, ता. अंमळनेर, जि. जळगांव | कला |

• सदर महाविद्यालयास देण्यात आलेली परवानगी सध्या विना अनुदान तत्वावर असून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या अनुदानासंदर्भातील शासन निर्णयाच्या अटींच्या अधिन राहून या महाविद्यालयास अनुदान तत्वावर आणण्याचा यथावकाश विचार करण्यात येईल.

(कृपया मागे पहा.)

**प्राचार्य**
**कै. न्हानाभाऊ मन्साराम तुकाराम पाटील**

• महाविद्यालयास जी विद्याशाखा सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे, विद्याशाखेच्या त्रिवर्षीय पदवी परीक्षेच्या पहिल्या वर्षाच्या वर्गात खाली दर्शविल्याप्रमाणे विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तरच वर्ग सन २००१-२००२ पासून सुरु करावा.

अ) शहरी विभाग ६०
ब) आदिवासी विभाग ४०
क) ग्रामीण विभाग ५०
ड) महिला महाविद्यालय ५०

• तसेच, सन २००१-२००२ या शैक्षणिक वर्षाच्या शेवटी होणा-या प्रथम वर्षाच्या विद्यापीठ परीक्षेत कमीत कमी खालीलप्रमाणे विद्यार्थी बसणे आवश्यक आहे :-

अ) शहरी विभाग ५०
ब) आदिवासी विभाग ३०
क) ग्रामीण विभाग ४०
ड) महिला महाविद्यालय ४०

२. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम ८३ मधील तरतुदीनुसार संलग्नीकरण करण्याबाबत योग्य ती कार्यवाही विद्यापीठाने तात्काळ करावी व पूर्तता अहवाल संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांना अग्रेषित करावा.

३. तसेच वरील संस्थेस ज्या ठिकाणी नवीन महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे, त्या ठिकाणी अन्य संस्थांचे प्रस्ताव असल्यास ते अमान्य करण्यात आले असल्याचे विद्यापीठ स्तरावरुन संबंधित संस्थांना कळविण्यात यावे.

आपला विश्वासू,

(श्री. रा. जोशी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत -
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
विभागीय सह संचालक (उ.शि.), जळगांव.
अध्यक्ष/सचिव, ग्रामविकास शिक्षण मंडळ, मारवड संचलित कै. न्हानाभाऊ मन्साराम तुकाराम पाटील कला महाविद्यालय, अंमळनेर, जि. जळगांव
खाजगी सचिव, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
खाजगी सचिव, मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
खाजगी सचिव, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई.
खाजगी सचिव, राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई.
स्वीय सहाय्यक (प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण)
निवड नस्ती मशि-३.

प्राचार्य
कै. न्हानाभाऊ मन्साराम तुकाराम पाटील
कला महाविद्यालय, मारवड

Government Of Maharashtra

NGC 2000/NMU/298/2000/MS3
HigherEducation Dept.
Mantralaya Vistar Bhavan,
Mumbai 400032
Date - 14 March 2001

To,
Registrar,
North Maharashtra University,
Jalgaon.

Sub :- Permission to start new college
Ref :- Sub- registrar [ affilation]
North Maharashtra University,Jalgaon. Letter No-NMU/5/Edu-23/4787/99
Dated- 29/11/1999

Sir,

Considering the demand of higher education at local and surrounding palces LIC report and its suggestions submitted by University in academic year 2000-2001. According to Maharashtra University act and regulation of 1994 section 82[5] following institute and place, on condition permission is granted to start new college from academic year 2001-2002.

| Name of the Institute | Place | Faculty |
|---|---|---|
| Gram Vikas shikshan Mandal's Late Nhanbhau Mansaram Tukaram Patil Arts college, Marwad. Tal.Amalner,Dist.Jalgaon | At. Marwad. Tal.Amalner, Dist.Jalgaon | Arts |

The permission of hte above college is temporary not granted according to govt. grant rules and regulations it would be considerde for grant in- aid time to time in future.
The permission is to start classes from academic year 2001-2002 sufficient student criteria for admission to first year B.A. as following-

A] Urban area - 60
B] Tribal area - 40
C] Rural area - 50
D] women's college - 50

Following number of students should appear for first year exam held in academic year 2001-2002

A] Urban area - 50
B] Tribal area - 30
C] Rural area - 40
D] women's college - 40

2] The process of affiliation should be done by university and complete report submitted to director higher education according to Maharashtra University act 1994 section 83.
3] To convey on University level to other Institute about non permission to their application to start new college.

Yours faithfully,
Sd/-

1] Director, Higher Education M.S.Pune
2] Joint Director Higher Education M.S.Jalgaon
3] President GVSMandal's Marwad,Sanchlit Late.N.M.T.Patil Arts college,Marwad, Tal.Amalner,Dist.Jalgao
4] Secretary Chief Minister M.S.Mumbai
5] Secretary -----------------------M.S.Mumbai
6] Secretary Minister,Higher Education,Mumbai
7] Secretary Minister of state,Higher Education,Mumbai

PRINCIPAL
Late Nhanbhau Mansaram Tukaram Patil
Arts College, Marwad
Tal. Amalner, Dist.Jalgaon